# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 24.11.2016 (का.प.क्र.-08) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक 24 नोव्हेंबर 2016 (का.प.क्र .08) रोजी मा.सभापती श्री.मोहन मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.20 वाजता सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रविंद्र निकम, उपआयुक्त (प्र.), नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 5. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 6. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 7. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 8. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 9. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 10. | स.स.श्री.अजीम अहेमद रफिक |
| 11. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 12. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 13. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 14. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

**विषय क्र. 70 :** (विषय क्र.68 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.11/11/2016 (का.प.क्र.07) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध मुख्य रस्त्यांची सुधारणा करण्याचे कामाचे विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता निविदा पूर्व व निविदा नंतरची कामे करणे करीता PMC यांची नियुक्ती करणे.

या कामाचे ठेकेदार, जगप्रयाग इन्फ्रा प्रा. लि. यांचेकडून प्रकल्प अहवाल किमतीच्या 1.20% (सर्व्हीस टॅक्ससह) दराने म्हणजेच प्रकल्प किंमत र.रु.150.00 कोटी पर्यंत करुन घेणेच्या 1.20% रक्कम रू.1.80 कोटी + लागू सर्व करासह करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत..

संदर्भ:- टेंडर क्र. EOI Name No: AMC /IRDP/420/2016 दि. 29/06/2016 सन ID- 2016 ANCA-137081-2

महाशय,

| **1.** | **खात्याचे नांव** | **कार्यकारी अभियंता (4,5,6,7,9)** |
|---|---|---|
| 2. | कामाचे स्वरुप | रू. 150.00 कोटी प्रकल्प किमती करीता शहरातील विविध रस्त्याची सुधारणा करणे बाबत डी. पी. आर. बनविणे. |

| | | |
|---|---|---|
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मान्य झाले आहे. मा. सर्वसाधारण सभा दि. 10/05/2016 (का.प.क्र.20) विषय क्र. 433 नूसार ठराव. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | डी. पी. आर. तयार करण्यासाठी पी. एम. सी. नियुक्ती करीता टेंडर मागविण्यात आले. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई- टेंडरद्वारे प्रसिध्दी दि. 29/06/2016 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | पहिली वेळ दि. 15/07/2016 दु. 2.00 वाजेपर्यंत<br>दुसरी वेळ :- 5/8/2016 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | पहिली वेळ दि. 15/07/2016<br>दुसरी वेळ :- दि. 8/8/2016 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकूण 03 टेंडर्स प्राप्त झाले. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1) | जगप्रयाग इन्फ्रा प्रा. लि., शॉप नं. 03 मलंर्ग बिजनेस सेंटर, अंबेजोगाई रोड , लातूर 431512 | रू. 150.00 कोटी रक्कमेचा DPR किमंत | DPR किमतीच्या 1.90% (सर्व करांसहीत)<br>( वाटाघाटी अंती 1.20% निश्चीत केले. |
| 2) | सी. व्ही कंद कन्सलटंट प्रा. लि. 201/202, साई एम्पायर, तिसरा मजला | रू. 150.00 कोटी रक्कमेचा DPR किमंत | DPR किमतीच्या 2.65 % (सर्व करांसहीत) |
| 3) | दि निसर्ग कन्सलटन्सी , D-15 , दुसरा मजला, सेठीज सिटी प्लाझा, गडकरी चौक कालिका मंदिरासमोर जुना आग्रा रस्ता, नाशिक 422001 | रू. 150.00 कोटी रक्कमेचा DPR किमंत | DPR किमतीच्या 2.88 % (सर्व करांसहीत) |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. वाटाघाटी करीता शिफारस करण्यात आली व वाटाघाटी अंती DPR किमतीच्या 0.50% निविदा पूर्व व 0.70 % निविदा नंतरच्या कामाकरीता याप्रमाणे 1.20% (सर्व करांसहीत) दरनिश्चीत करण्यात आले. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | निरंक |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | लेखाशिर्ष pmc चार्जेस रू. 3.75 कोटी सन 2016-2017 पृष्ट क्र. E-52 प्रमाणे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | निरंक |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | निरंक |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे? | निरंक |
| | तरी विषयांकीत काम ठेकेदार जगप्रयाग इन्फ्रा प्रा. लि.,यांचेकडून. प्रत्यक्ष प्रकल्प किंमतीच्या 0.50 % निविदा पूर्व + 0.70 % निविदा नंतर याप्रमाणे एकूण 1.20 % (सर्व करासह) वाटाघाटी दराने टेंडर / EOI अटी/शर्तीनूसार करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्र.70

श्री.राजगौरव वानखेडे :मागील स्थायी समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार स्थायी समितीने प्रशासनाला असे आदेश दिले होते की, पी.एम.सी.च्या नेमणुकी बाबत मा.सुनिल केंद्रेकर यांचेकडे डी.पी.आर. तयार करण्याबाबत विनंती केली होती. तसेच बी ॲण्ड सीच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमार्फत काम करण्या बाबत तपासणी करून कार्यवाही करण्याबाबत सुचना केलेली होती. त्या संदर्भात प्रशासनाने कोणते प्रयत्न केले. खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभि.(श्री.सिकंदर) :अभियांत्रिकी कॉलेजला याबाबत संपर्क साधण्यात आला होता. त्यांचे म्हणन्यानुसार रस्त्यांच्या कामाचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन अभियांत्रिकीकडून करून देण्यात येते, त्यामुळे डी.पी.आर.तयार करण्याचे काम करता येणार नाही.

श्री.विकास एडके :अभियांत्रिकी कॉलेजला अधिकाऱ्यांना डी.पी.आर. तयार करण्याच्या संदर्भात जो पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे, तो दाखविण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :लेखी कळविण्यात आले पाहिजे होते, या बाबतची माहिती देण्यात यावी.

कार्य.अभि.(श्री.सिकंदर) :अभियांत्रिकीला काम करण्यात येणार आहे का? अशी विचारणा केली.

श्री.कैलास गायकवाड :मागील स्थायी समिती मध्ये सिडको,बी & सी यांना विनंती करण्या संदर्भात निर्णय दिला होता. महानगरपालिकेच्या तिजोरीमधून 1 कोटी 80 लाख रुपये प्रस्ताव मंजुर झाल्या बरोबर द्यावे लागणार आहे. पी.एम.सीच्या संदर्भाने केलेल्या चर्चेप्रमाणे 150 कोटी रुपयांचा ठराव करून दिला आहे. सहा महिन्यांचा कालावधी झालेला आहे. शासनाने पत्रव्यवहार केला आहे का? कि आदेश दिले आहे. शासनाकडून पीएमसी नेमणूकी बाबत काहीही सांगीतलेले नाही. त्यामुळे ही पीएमसी नियुक्त करण्याचे आवश्यकता नाही. 24 कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामा संदर्भात मा.न्यायालयात वाद चालु आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. ए-1,रेट लिस्ट ची कामे करण्यास पैसे नाही. छोटे छोटे ड्रेनेज चोकअपचेही कामे होत नाही. त्यामुळे कोटयावधी रुपये कशासाठी द्यायचे? सदरील प्रस्ताव मंजुर करावा, परंतु शासनाकडून आलेल्या फंडातून रक्कम अदा केली जावी. अटींच्या अधिन टाकून प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :मागील बैठकीत दिलेल्या निर्णयाचा खुलासा व्हावा. प्रशासनाने (डी.पी.आर. तयार करणे बाबत) कळविलेले नाही, श्री.सुनिल केंद्रेकर यांना पत्र व्यवहार का करण्यात आला नाही?

कार्यकारी अभियंता :लेखी पत्र दिलेले नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :मागील बैठकीत दिलेल्या आदेशाचे पालन झालेले नाही, प्रशासनाने काम केलेले नाही. पीएमसीला रुपये 1 कोटी 80 लाख रुपये कशासाठी द्यायचे. मनपाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. सदर प्रस्तावास विरोध आहे. डीपीआर संदर्भात मी

| | |
|---|---|
| | स्वतः श्री.केंद्रेकर यांचेशी चर्चा केली, तेव्हा ते म्हणाले की, तसे लेखी मनपाने देण्यात यावे, मा.आयुक्त यांनीही यास मान्यता दिली आहे. 1 कोटी 80 लाख रुपये विनाकारण का खर्च करायचे? सी.एम. यांचे सोबत चर्चा झालेली आहे. व्यवस्थित अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडे पाठविण्यात यावे. शासन 100% निधी देणार आहे. फक्त अंदाजपत्रक तयार करायचे आहे. व्यर्थ पैसा का द्यायचा?कुणाची दिशाभुल करण्यात येवू नये. |
| श्री. कैलास गायकवाड | :शासनाचे पत्र येईल, तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. |
| श्री. राजगौरव वानखेडे | :सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा. |
| श्री.मनगटे गजानन | :सदर प्रस्ताव रद्द झाल्यास शहराच्या विकास होणार नाही. |
| श्री. अजीम अहमद | :प्रस्ताव रद्द करण्यात यावा. |
| श्रीमती संगिता वाघुले | :सदरील प्रस्तावात विरोध आहे. |
| श्री.अजिम अहमद | :सेवानिवृत्त अधिकारी यांना काम देण्यात यावे. |
| श्री.रावसाहेब आमले | :सेवानिवृत्त अधिकारी/अभियंते यांच्या बाबत प्रशासनाने कोणती तयारी केली? खुलासा करण्यात यावा. |
| श्री.कैलास गायकवाड | :शहराच्या विकासा संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात यावा. त्यास आमची सहमती आहे. |
| श्री.विकास एडके | :मागील बैठकीत झालेल्या चर्चे प्रमाणे प्रशासनाने कुठलाही निर्णय घेतला नाही. मनपामध्ये मागील पीएमसी नियुक्ती नंतरची परिस्थिती बघता पीएमसीची गरज नाही. श्री.केंद्रेकर यांना विनंती करण्यात येईल. पीएमसी नेमणूकी संदर्भात आमचा विरोध आहे. समांतर, भूमिगत गटार योजना, बीओटी, 24 कोटी रस्ते असे अनेक कामांवर पीएमसी नेमण्यात आली होती परंतु त्यांच्या कामांचा अनुभव अतिशय वाईट आहे. त्यामुळे या प्रस्तावात एमआयएम तर्फे विरोध करण्यात येतो. |
| श्री.रावसाहेब आमले | :संबंधीत अधिकारी यांचेकडून खुलासा करण्यात यावा. आपल्याकडे सक्षम अधिकारी असल्यास त्यांचेकडून हे काम करून घेण्यात यावे. |
| श्री.कैलास गायकवाड | :शासनाचा कुठलाही निर्णय येत नाही. तो पर्यंत हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा. |
| श्री.नितीन चित्ते | :मागील महानगरपालिकेचा इतिहास बघीतल्यास आजपर्यंत पीएमसीने कोणतेही काम व्यवस्थित केलेले नाही. समांतर, भुमिगत गटार, डिफर पेमेंट, बीओटी येथील पीएमसी ने कुठलेही चांगले काम केलेले नाही. महानगरपालिकेकडे हवे असलेले मॅनपॉवर नाही, मनपामधील उपअभियंता/अभियंता फक्त ड्रेनेजचे चोकअप काढण्यासाठी आहे का? हा प्रश्न पडतो, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. एकही पीएमसीचा हेड सुपरवाईजर,त्यांचे अधिकारी, यांची नावे माहित नाही की, ते कधी प्रत्यक्षात दिसलेले नाही. त्यामुळे सदर प्रस्तावास आमचा विरोध आहे. |
| श्री.मकरंद कुलकर्णी | :मागील बैठकीत निर्णय झालेला आहे. श्री.केंद्रेकर यांचेकडून हे काम करण्यात यावे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :प्रशासनाला 150 कोटी रुपये नको आहेत का? शासन निधी द्यायला तयार आहे. मा.आयुक्त यांचीही तयारी आहे. मा.आयुक्त यांना स्थायी समितीने आदेश देवून हे काम करून घेण्यात यावे. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा. |
| श्री.मकरंद कुलकर्णी | :सर्वच स.सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहे. |
| श्री.नितीन चित्ते | :मनपाच्या अभियंत्यांकडे हि जबाबदारी सोपविण्यात यावी. एखाद्या पीएमसीची यादी दाखविण्यात यावी. जीने चांगले काम केलेले आहे. मनपामध्ये एकाही प्रोजेक्टमध्ये पीएमसी ने चांगले काम केलेले नाही. तसेच त्यांचे अधिकारी/कर्मचारीही कधी प्रत्यक्षात आढळून आलेले नाही. सदर प्रस्तावास आमचा विरोध आहे. |

श्री.गजानन मनगटे :सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी. सदर प्रस्तावास मंजुरी देतांना शासनाकडून जेवढा निधी येईल, तेवढेच काम करून घेण्यात यावे. या प्रस्तावा अभावी शहराचा विकासात खोडा घातला, असे होऊ नये.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रस्ताव मंजुर करायच्या असेल तर मतदान घेण्यात यावे.

श्री.कैलास गायकवाड :शासनाचा पत्र व्यवहार नाही, तोपर्यंत हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा.सभापती :सदरच्या प्रस्तावा बाबत सभागृहात स.सदस्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत. सर्व स.सदस्यांना या संदर्भात पुरेसा वेळ देण्यात आलेला आहे. मागील बैठकीत दिलेल्या निर्णयानुसार श्री.केंद्रेकर यांना विनंती करा? सिडको बी ॲण्ड सी किंवा सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून मानधनावर डीपीआरचे काम करून घेण्यासंदर्भात आदेशीत केले होते, प्रशासनाचा यावर खुलासा आलेला आहे की, अभियांतिकीच्या प्राध्यापकांना विचारणा केली. स.सदस्य श्री.राजगौरव वानखेडे यांनी सांगीतल्या नुसार श्री.केंद्रेकर यांनी डीपीआर तयार करण्या संदर्भात लेखी पत्र सांगीतले आहे. मा.आयुक्त यांनी सांगीतले की, डीपीआर बाबत मी मदत करतो, मा.आयुक्त मदत करत असेल तर कमीत कमी खर्चामध्ये हे काम व्हावे असे मत आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीने माझे वैयक्तिक मते हा प्रस्ताव मंजुर करावा असे आहे. काही सदस्यांची तशी भावना आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे प्रश्न निर्माण झालेला आहे. संबंधीत अधिकारी यांनी अभियंत्रिकी महाविद्यालयाला विचारणा केलेली आहे. सदरचा प्रस्ताव महत्वाचा आहे. शासनाकडून 150 कोटी रुपये देण्यात येत आहे. शहराच्या विकासाचे काम झाले असते पण स.सदस्यांचे म्हणने आहे की, प्रस्ताव रद्द करा, हा प्रस्ताव रद्द करण्यता येतो.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 71 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.65, अहिंसानगर येथील रस्त्याचे व्हॉईट टॉपींग कॉक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.29,93,980/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.20/10/2016 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2016-2017 मधील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग एस.सी.आर. वॉर्ड फ पृष्ठ क्र.48 मध्ये अ.क्र.02 वर 40.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,93,980/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.65, अहिंसानगर येथील रस्त्याचे व्हॉईट टॉपींग कॉक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,93,980/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 72 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.95, विजयनगर चौक ते शिवनेरी कॉलनी श्री.रूचके यांचे घरापर्यंत काँक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.44,97,350/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.20/10/2016 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2016-2017 मधील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष मध्ये एस.सी.आर. वार्ड ई पृष्ठ क्र.37 मध्ये अ.क्र.14 वर 45.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.44,97,350/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.95, विजयनगर चौक ते शिवनेरी कॉलनी श्री.रूचके यांचे घरापर्यंत काँक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.44,97,350/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 73 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.95, शिवनेरी कॉलनी अंतर्गत गुंठेवारी भागात काँक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.29,66,849/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.20/10/2016 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2016-2017 मधील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग एस.सी.आर. वार्ड ई पृष्ठ क्र.37 मध्ये अ.क्र.15 वर 30.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,66,849/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 73 ते 86 मंजूर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.95, शिवनेरी कॉलनी अंतर्गत गुंठेवारी भागात काँक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,66,849/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 74 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.97, सुतगिरणी चौक ते बजरंगनगर कमानी पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.34,97,800/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.13/10/2016 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2016-2017 मधील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग जी.बी.आर. वार्ड फ पृष्ठ क्र.08 मध्ये अ.क्र.69 वर 35.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.34,97,800/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.97, सुतगिरणी चौक ते बजरंगनगर कमानी पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.34,97,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 75 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.55, रोहीदासपुरा जुना मोंढा परिसरात काँक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2013-2014 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,54,853/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च

सन 2016-2017 च्या आर्थिक वर्षात नागरी दलित वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षामधुन करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी मिळाली असून मा.स्थायी समिती सभागृहासमोर पाठविणे बाबत आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू.29,54,853/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.55, रोहीदासपुरा जुना मोंढा परिसरात कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 29,54,853/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 76 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.80 अंतर्गत एन-3 सिडको येथील विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.49,96,104/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकामधुन करण्यात येईल. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी मिळाली असून मा.स्थायी समिती सभागृह समोर ठेवणे बाबत शिफारस केली आहे.

करीता अंदाजपत्रक र.रू.49,96,104/-चा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.80 अंतर्गत एन-3 सिडको येथील विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,96,104/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 77 :**

प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.81 ठाकरेनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 49,99,470/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2016-2017 च्या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षका मधुन करण्यात येईल.सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी मिळाली असून मा.स्थायी समिती सभागृहासमोर ठेवणे बाबत शिफारस केली आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.49,99,470/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.81 ठाकरेनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 49,99,470/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 78 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.57 संजयनगर भागातील हमजा मस्जीद खासगेट ते गंजेशहीदा कब्रस्तान समोरील मुख्य रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2015-16 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.44,97,505/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील जी.बी.आर.-वॉर्ड सी पान क्र.4 अ.क्र.27 मध्ये उपलब्ध नविन कॉंक्रीट रस्ते शहरी

भाग या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या 45.00 लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात रस्त्यास, वेट मिक्स करणे, व्हॉईट टॉपींग करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.44,97,505/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.57 संजयनगर भागातील हमजा मस्जीद खासगेट ते गंजेशहीदा कब्रस्तान समोरील मुख्य रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.44,97,505/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 79 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.98 उल्कानगरी येथील आदित्यनगर मुख्य रस्त्यांचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटद्वारे करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2014-2015 नुसार रक्कम रू.33,86,386/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.28/06/2016 अन्वये प्रशासकीय मान्यता आदेश प्राप्त झाले आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2016-2017 मधील ले-आऊट न्यु वर्क नविन कॉंक्रीट रस्ते पृष्ठ क्र.12 अ.क्र.23 वर दर्शविण्यात आलेले आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.33,86,386/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.98 उल्कानगरी येथील आदित्यनगर मुख्य रस्त्यांचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटद्वारे करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.33,86,386/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 80 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हिलाल कॉलनी खामनदीत (नाला) संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,99,816/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील नाला ट्रेनिंग कामे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.49,99,816/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिलाल कॉलनी खामनदीत (नाला) संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,99,816/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 81 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.35 अंतर्गत नाला (आनंद गाडेनगर) ते डॉ.आंबेडकर सभागृह ते कनिष्ठ महाविद्यालय पर्यंत रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करून पक्का रस्ता तयार करणे आवश्यक आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.40,63,514/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17

मधील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 26/10/2016 रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तरी वार्ड क्र.35 अंतर्गत नाला (आनंद गाडेनगर) ते डॉ.आंबेडकर सभागृह ते कनिष्ठ महाविद्यालय पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे र.रू.40,63,514/- चा अंदाजपत्रक प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.35 अंतर्गत नाला (आनंद गाडेनगर) ते डॉ.आंबेडकर सभागृह ते कनिष्ठ महाविद्यालय पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.40,63,514/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 82 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड (क) अंतर्गत विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,44,474/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील पान क्र.Ward-C-ABS-1 अ.क्र.4 मध्ये उपलब्ध शहरी भागात रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या रक्कम रू.1.00 कोटी तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात मुरूमाद्वारे, जीएसबीचा वापर करून, डांबरीकरणाद्वारे खड्डे भरणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.49,44,474/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड (क) अंतर्गत विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,44,474/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 83 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.14 पडेगांव अंतर्गत नासिक हायवे ते चिनार आर्केड ते गुलमोहर कॉलनी व पडेगांव अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,95,633/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.29,95,633/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.14 पडेगांव अंतर्गत नासिक हायवे ते चिनार आर्केड ते गुलमोहर कॉलनी व पडेगांव अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,95,633/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 84 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक 67 सिल्लेखाना अंतर्गत सब्जीमंडी छोटा तकीया, बडा तकीया येथे कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,97,351/- यास प्रशासकीय मान्यता

प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कम रू.30.00 लक्ष च्या तरतुद मधुन करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,97,351/- मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक 67 सिल्लेखाना अंतर्गत सब्जीमंडी छोटा तकीया, बडा तकीया येथे कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 29,97,351/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 85 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.48 अंतर्गत जेथलिया टॉवर्स ते अंगुरीबाग शनिमंदिर पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसूची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,98,929/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या र.रू.30.00 लक्षच्या तरतुद मधुन करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,98,929/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.48 अंतर्गत जेथलिया टॉवर्स ते अंगुरीबाग शनिमंदिर पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 29,98,929/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 86 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रमांक 46 अंतर्गत नवाबपुरा येथे बुक्कलगुडा व विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,99,500/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,99,500/- मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक 46 अंतर्गत नवाबपुरा येथे बुक्कलगुडा व विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 49,99,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 87 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गात दैनिक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहे. त्यानुसार सद्यस्थितीत वर्ग-3 चे 59 व वर्ग-4 चे 141 (वर्ग-3 नोंदणी लिपीक-17 व वर्ग-4 ची 124) असे एकुण 200 कर्मचारी कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रति दिवस रू.430/- व वर्ग-4 संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रति दिवस 340/- देण्यांत येत आहे. तथापी कालेलकर समेटानुसार दैनिक वेतनावर कार्यरत वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.430/- ऐवजी रू.525/- प्रति दिवस व वर्ग-4 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.340/- ऐवजी रू.424/- प्रति दिवस याप्रमाणे वाढ करणेबाबत शिफारस केली आहे. यासाठी प्रतिमाह रू.4,58,536/- व प्रतिवर्ष रू.55,02,432/- एवढा वाढीव खर्च वाढणार आहे.

करीता मा.स्थायी समिती ज्या दिनांकापासून उक्त वाढीव वेतन लागू करण्याबाबत मान्यता प्रदान करील, त्या दिनांकापासून सद्यस्थितीत कार्यरत दैनिक वेतनावरील वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.525/- प्रति दिवस व वर्ग-4 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.424/- प्रति दिवस वाढीव वेतन लागू करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.सुरे सीताराम इसराम : विषय क्रमांक 87 हा आस्थापनेवर वर्ग 3 व वर्ग 4 दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आहे. आत्तापर्यंत हे कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करतात. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा तसेच दैनंदिन गरजांची पुर्तता इतक्या कमी वेतनामध्ये करता येत नाही, त्यामुळे त्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. वर्ग 4 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.340 ऐवजी 424 रूपये प्रति दिवस व वर्ग 3 संवर्गातील कर्मचारी यांना रूपये 430 ऐवजी रूपये 525 प्रति दिवस वेतनवाढ देण्यात येणार आहे. माझ्या माहिती प्रमाणे महाराणा सेक्युरिटी यांचेकडून कंत्राट पध्दतीने लावलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत काम न करताच लाखो रूपयांचे बील अदा केलेले आहे. दैनिक वेतनाचे कर्मचारी हे तर प्रत्यक्षात अतिशय उत्कृष्ठपणे महानगरपालिकेत काम करीत आहे. परंतु त्यांना वेतन देण्यात येत नाही. शासनाच्या कालेलकर समितीच्या समेटानुसार वेतनवाढ देणे योग्यच आहे. दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना मागील वेतनवाढ सन 2012 मध्ये देण्यात आली होती. कालेलकर समितीच्या समेटानुसार दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना दिनांक 01.01.2014 पासून फरकासह वेतनवाढ मंजूर करण्यात यावी. दैनिक वेतन कर्मचारी अतिशय कमी पगारात काम करत आहे ही बाब लक्षात घेवुन सकारात्मक निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती :महाराणा सेक्युरिटी सप्लाय बाबत प्रशासनाकडुन चौकशी चालु आहे. याबाबत निश्चितच कार्यवाही करण्यात येईल. तसेच विषय क्रमांक 87 हा प्रशासनाकडुन आलेला विषय आहे. नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गात दैनिक वेतनावर कार्यरत वर्ग-3 चे 59 व वर्ग-4 चे 141 (वर्ग-3 नोंदणी लिपीक-17 व वर्ग-4 ची 124) असे एकुण 200 कर्मचारी यांना कालेलकर समेटानुसार दैनिक वेतनावर कार्यरत वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.430/- ऐवजी रू.525/- प्रति दिवस व वर्ग-4 संवर्गातील कर्मचाऱ्यांना रू.340/- ऐवजी रू.424/- प्रति दिवस याप्रमाणे वाढ करणेस तसेच यासाठी प्रतिमाह रू.4,58,536/- व प्रतिवर्ष रू.55,02,432/- एवढ्या वाढीव खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 88 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहेत की, माता व बाल संगोपन प्रकल्पांतर्गत कार्यरत 6 महिला पर्यवेक्षक कार्यरत यांना प्रतिमाह रू.3000/- मानधन देण्यात येत होते. मा.सर्वसाधारण सभा दिनांक 20/04/2016 विषय क्र.402 अन्वये आशा पर्यवेक्षक मनपा आस्थापनेवर कार्यरत दैनिक वेतनावरील कर्मचारी यांच्या प्रमाणे रू.430/- प्रतिदिन मानधन मनपा फंडातून देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. प्रस्ताव दर्शविल्यानुसार प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.रावसाहेब आमले :सदरील प्रस्ताव नियमानुसार ठेवलेला आहे का? खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधि. :विषय क्रमांक 88 हा आरोग्य विभागांतर्गत माता बाल संगोपन प्रकल्पांतर्गत कार्यरत 6 पर्यवेक्षक यांना प्रतिमहा 3000/- रुपये मानधन देण्यात येते, त्यांनी केलेल्या लेखी

विनंती केली होती, मानधन वाढीवबाबत Minimum Wages Act नुसार सदरील प्रस्ताव नियमानुसार ठेवलेला आहे.

श्री.रावसाहेब आमले :सदरील कर्मचारी मनपाच्या आस्थापनेवर आहे का?

आरोग्य वैद्यकीय अधि. :महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सदरील कर्मचारी नाही.

श्री.रावसाहेब आमले :दैनिक वेतन कर्मचाऱ्यांप्रमाणे हा प्रस्ताव मंजुर करण्यात येवू नये.

मा.सभापती :नियमानुसार देता येते का? खुलासा करण्यात यावे.

मा.आयुक्त :पर्यवेक्षकांच्या कामकाजाबाबत माहिती देण्यात यावी.

श्रीमती संगिता वाघुले :लिंक वर्कस् यांच्याही मानधनात वाढ देण्यात यावी.

श्री.कैलास गायकवाड :वेतनवाढ देण्यास हरकत नाही.

श्री.रावसाहेब आमले :नियमात नाही तर कसे देता यईल? सदरील कर्मचारी मनपाच्या आस्थापानेवरील नाही, त्यामुळे नियमात नाही.

श्री.नितीन चित्ते :दि.24.11.2015 रोजी पत्र दिलेले आहे. परंतु माहिती दिलेली नाही.

श्रीमती मुंडे :मनपामध्ये किती संगणक ऑपरेटर काम करतात? माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :विषय क्र.88 नियमानुसार चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा. पर्यवेक्षकांच्या कामाबाबत माहिती देण्यात यावी. विषय क्रमांक 88 स्थगीत करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत यावा, असे ठरले.

**विषय क्र. 89 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,....

विषय : जिल्हा नियोजन समिती निधी अंतर्गत बौध्दनगर, शिवशंकर कॉलनी, बालाजीनगर येथे सिमेंट रोड तयार करणे या कामाचे ठेकेदार मे. श्री.कासलीवाल शितल कुमार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.42,74,652/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.57-16-279 सन 2016-17.

महोदय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.09 |
| 2. | कामाचे स्वरुप | सिमेंट रस्ता |
| 3. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 44,64,389/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले. | 44,64,389/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | तत्कालीन ई-निविदा विभागा मार्फत |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | तत्कालीन ई-निविदा विभागा मार्फत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 24/06/2016 |
| 6 | एकुण किती टेंडर्स आली ? | 04 |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र | ठेक्ेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1) | श्री.कासलीवाल शितलकुमार | 42,74,652/- | 4.25 % कमी दराने |
| 2) | श्री.बरथुने आकाश भरत | 43,05,903/- | 3.55 % कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 3) | श्री.महेश भागवत | 43,75,101/- | 2.00 % कमी दराने |
| 4) | श्री.संदीप किसनराव फैजे | 46,87,608/- | 5.00 % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | नाही |
| | असल्यास कारणे नमूद करावीत | ---- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे | जिल्हा नियोजन निधी (नगरोत्थान) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय ? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | मा.सर्वसाधारण सभा दि.21/11/ 2015 विषय क्र.248 |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार मे.श्री.कासलीवाल शितलकुमार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25 % कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रु.42,74,652 पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फकत अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :विषय क्र.89 मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा नियोजन समिती निधी अंतर्गत बौध्दनगर, शिवशंकर कॉलनी, बालाजीनगर येथे सिमेंट रोड तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25% कमी दराचे निविदाधारक मे.श्री.कासलीवाल शितलकुमार यांचेकडून टेंडर रक्कम रू.42,74,652/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 90 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : वॉर्ड क्र.35 अंतर्गत नारेगाव माणिक नगर, आनंद गाडे नगर व अजीज कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.

या कामाचे ठेकेदार मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांचेकडून 4% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.4240854/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक/Tender ID 2016 -AMCA-140433-8

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 02. | कामाचे स्वरूप | वार्ड क्र.35 अंतर्गत नारेगाव माणिकनगर, आनंद गाडेनगर व अजीज कॉलनी येथे विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. |
| 03. | पुर्व गणन पत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.02/07/2016 विषय क्र.03 र.रू.4453000/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.4240854/- |

| | | |
|---|---|---|
| 04. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती, त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | On line Tender |
| 05. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | 24 ऑगस्ट 2016 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | 30 ऑगस्ट 2016 |
| 06. | एकुण किती टेंडर आली? | तिन (3) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पुर्व गणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 01. | मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन, खासगेट, जिन्सी, औरंगाबाद | र.रू.4071220.82/- | 4% कमी दराने |
| 02. | मे.एफ.के.कन्स्ट्रक्शन,जळगाव रोड, सावंगी, गट नं.121, औरंगाबाद | र.रू.4109388.52/- | 3.10% कमी दराने |
| 03. | श्री.प्रभाकर गणपतराव मोहिते रेणुका माता मंदीर जळगांव रोड, औरंगाबाद | र.रू.4168760.49/- | 1.70% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 07. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलीत बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 08. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | भांडवली कामे जलनि:सारण |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 09. | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझीट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पुर्व गणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे. | आहे |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांचेकडून 4% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.4071220.82/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फक्त अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

मा.सभापती : विषय क्र.90 ते 95 मंजुर करण्यांत येतात. तसेच ऐनवेळीचे सर्व अंदाजपत्रक मंजुर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.35 अंतर्गत नारेगाव माणिक नगर, आनंद गाडे नगर व अजीज कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्त कमी दराचे निविदाधारक मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांचेकडून 4% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.4071220.82/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 91 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : वॉर्ड क्र.8 सुरेवाडी येथील मुख्य रस्त्याचे ट्रिमिक्स सिमेंट कॉंक्रीट करणे.

या कामाचे ठेकेदार श्री.मोहम्मद अहेमद सिद्दीकी यांचेकडून 15.78% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.4195849.69/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक/Tender ID-2016-AMCA-145807-1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 02. | कामाचे स्वरूप | वार्ड क्र.08 सुरेवाडी येथील मुख्य रस्त्याचे ट्रिमिक्स सिमेंट कॉंक्रीट करणे. |
| 03. | पुर्व गणन पत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.04/08/2016 विषय क्र.21 र.रू.4982011/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू. 4982011/- |
| 04. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती, त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| 05. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | 18 ऑगस्ट 2016 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | 20 ऑगस्ट 2016 |
| 06. | एकुण किती टेंडर आली? | तिन (3) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पुर्व गणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 01. | श्री.मोहम्मद अहेमद सिद्दीकी, कंत्राटदार, घर क्र.4-10-74 पी.आईस फॅक्ट्रीच्या मागे बशीर कॉलनी, रोषणगेट, औरंगाबाद | र.रू.4195849.69/- | 15.78% कमी दराने |
| 02. | मे मासकॉट कन्स्ट्रक्शन कंपनी एच न 1, 27-45 न्यु मंझुरपुरा, औरंगाबाद | र.रू.4222254.35/- | 15.25% कमी दराने |
| 03. | मे.सहारा कंन्स्ट्रक्शन अंबाजोगाई (भागीदारी संस्था) शाखा कार्यालय घ.नं.1-11-44/1 अजम कॉलनी रोषणगेट औरंगाबाद | र.रू.4234211.17/- | 15.01% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 07. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलीत बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
